# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१९ डिसेंबर, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7447744100 (PRO)


## चंद्रपुर स्थानिक गुन्हे शाखेकडुन घरफोडीचे गुन्हे उघडकीस २ लक्ष ४३ हजाराचे सोन्याचे दागीने हस्तगत

दिनांक १७/१२/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मालमत्तेविरूध्द झालेल्या गुन्हयांचा शोध घेणेकरीता पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, एका विधिसंघर्षग्रस्त बालकाकडे सोन्याचे दागीने असुन ते त्यांने चोरी केलेले आहे. अशा माहितीवरून सदर विधिसंघर्षग्रस्त बालकाचा शोध घेवुन त्यांचे पालकासमक्ष विचारपुस केली असता, त्यांने कबुली दिली की, पोलीस स्टेशन दुर्गापुर हद्दीत दोन घरफोडया केल्या होत्या.

यावरून सदर विधिसंघर्षग्रस्त बालकाकडुन पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप. क्र. ३८४/२०२० आणि ४१८/२०२० कलम ४५७,३८० भांदवि मधील ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी किं. २२,५००/—रू, ६ ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप्स किं. २७,०००/—रू, ३ ग्रॅम वजनाची सोन्यातील रिंग किं. १३,५००/—रू, ३२ ग्रॅम वजनाची सोन्याचे मंगळसुत्र किं. १,४४,०००/—रू, ६ ग्रॅम सोन्याचे अंगठी किं. २७,०००/—रू, २ ग्रॅम सोन्याची अंगठी किं. ९,०००/—रू असा **एकुण २,४३,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पोलीस स्टेशन दुर्गापुर येथील घरफोडीचे दोन्ही गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. अरविंद साळवे, श्री. प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर, स्थानिक गुन्हे शाखा पोनि. श्री. बाळासाहेब खाडे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. बोबडे, पोउपनि. गदादे, सफौ. भोयर, पोहवा. साळवे, पोशि. सतिश, प्राजंल, मिलींद, संदीप आणि पोशि. छगन जांभुळे सायबर पोलीस ठाणे चंद्रपुर यांनी केली.

———————————————————————————————————————